ePaper
केजरीवाल संकटात, मुंबईत येऊन ठाकरे-पवारांची भेट



| वर्ष - 7 | अंक -28 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पुण्यातील अनधिकृत बांधकामावर कारवाईचा हातोडा!
- अंकुशराव लांडगे नाट्यगृह 'घामाघूम'!

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 25 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पैलवान आमदाराच्या अंत:करणातील संवेदनशील मराठा!

## प्रवीण पिसाळ यांच्या कुटुंबियांना आमदार महेश लांडगे यांची मदत

### कर्तव्यनिधी म्हणून 5 लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगभरातील मराठा बांधवांना संघटित करुन आर्थिक आणि सामाजिक उन्नतीचे कार्य उभा करणारे दिवंगत मराठा प्रवीण पिसाळ यांच्या कुटुंबियांना आमदार महेश लांडगे यांनी मदतीचा हात दिला आहे. त्याच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वस्तरातून कौतूक होत आहे. त्यामुळे लाल मातीतील रांगडा पैलवान आमदार लांडगेंच्या हृदयाला मराठा बांधवाच्या निधनानंतर कुटुंबियांच्या मदतीसाठी पाझर फुटला आणि संवेदनशील मराठा जागा झाला... अशी संवेदनशील प्रतिक्रिया समाजमाध्यमातून उमटली आहे**





सातारा जिल्ह्यातील प्रवीण पिसाळ या तरुणाने मराठा समाजासाठी संघटन करुन 'वर्ल्ड मराठा ऑर्गनायझेशन'ची स्थापना केली. त्या माध्यमातून समाजातील तरुणांना नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभे राहण्याची प्रेरणा दिली. वैद्यकीय, रोजगार आणि व्यवसायात मदतीसाठी पुढाकार घेतला. मात्र, प्रवीण पिसाळ यांचे नुकतेच अकाली निधन झाले. त्यामुळे समस्त मराठा समाजासह पिसाळ कुटुंबियांचे कधीही न भरून येणारे असे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष महेश लांडगे यांनी पिसाळ कुटुंबियांच्या घरी भेट दिली आणि सांत्वन केले. तसेच, कर्तव्यनिधी म्हणून ५ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला आणि पिसाळ यांची मुलगी शुभ्रा हिच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याचा मनोदय व्यक्त केला. प्रवीण पिसाळ यांनी मराठा समाजातील तब्बल एक कोटीहून अधिक तरुणांचे भक्कम संघटन उभे केले आहे. त्यांच्या संघटनकौशल्यामुळे महाराष्ट्रभर तसेच देश विदेशातील मराठी तरुणांनाही प्रेरणा व बळ मिळाले आहे.

सकल मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठीचा त्यांचा लढा समाजाला दिशा देणारा आहे. कोरोना काळामध्ये त्यांनी महाराष्ट्रभर केलेली मदत अविस्मरणीय आहे. कुणालाही कधीही कसलीही मदत लागली, तर प्रवीण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहेत. त्यामुळे पिसाळ कुटुंबियांच्या पाठीशी राहणे, हे आपले कर्तव्य आहे, अशा भावना आमदार लांडगे यांनी व्यक्त केल्या.

### प्रवीण पिसाळ यांच्या आईला आश्रू अनावर...

» घर-प्रपंचापेक्षा मराठा समाजातील तरुणांच्या मदतीसाठी तत्पर रहाणारा मुलगा अचानक सोडून गेला. पिसाळ कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. त्यामुळे संपूर्ण राज्यातील मराठा समाजाकडून आधार देण्याचा प्रयत्न होत आहे. आमदार महेश लांडगे यांनीही घरी भेट दिली. आर्थिक मदत करीत यापुढील काळात कुटुंबाला मदतीसाठी पुढाकार घेण्याचा मनोदय केला. विशेष म्हणजे, प्रवीण पिसाळ यांच्या मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे प्रवीण पिसाळ यांच्या आईचा उर भरुन आला. त्यांनी अक्षरश: हंबरडा फोडला. तसेच, प्रवीणने मराठा समाजासाठी सुरू केलेल्या कार्यात आता आमदार महेश लांडगे यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन उपस्थित ग्रामस्थांनी केले.



" महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत मी स्वतः पाठपुरावा करीन आणि ज्या दिवशी ते साध्य होईल ती मराठा प्रवीण पिसाळ व त्यांच्या कार्याला खरी श्रद्धांजली असेल. आमची प्रत्यक्ष भेट झाली नाही. पण, कोविड काळात सोशल मीडियाच्या माध्यमातून एकत्रितपणे काम करण्याचा योग आला. एखादा तरुण समाजासाठी पुढाकार घेतो आणि अकाली निघून जातो, ही दुर्दैवी घटना आहे. यापुढील काळात पिसाळ कुटुंबियांसह मराठा समाजातील तरुणांना कोणत्याही अडचणीत मदत करण्यासाठी मी तत्परतेने प्रयत्नशील राहून समाजाच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घेणार आहे.

**- महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पुण्यातील अनधिकृत बांधकामावर कारवाईचा हातोडा!

## 'पीएमआरडीए'ची रेस्टॉरंट्सवर कारवाई

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील अनधिकृत बांधकामावर पीएमआरडीएने कारवाई केली आहे. 'पीएमआरडीए'ने दिलेल्या माहितीनुसार, मानस चौपाटी, थलासा, श्री स्टेज आणि हॉटेल ९० डिग्री या रेस्टॉरंटचे अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले. भुकूम येथे अनधिकृतपणे चालविण्यात येत असलेल्या रेस्टॉरंट कम पबवर पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मंगळवारी हातोडा चालविला. येथील पाच ते सहा रेस्टॉरंटचा अनधिकृत भाग पाडण्यात आला.**



पुण्याच्या वेशीवर भूगाव, भुकूम येथील पब आणि रेस्टॉरंट-बारमध्ये बेकायदा मद्य आणि हुक्क्याची विक्री होत असून, कालमर्यादेचे पालन न करता अगदी पहाटेपर्यंत येथे धांगडधिंगा चालतो.

या फोफावलेल्या पब संस्कृतीवर पोलिसांचे कोणतेही नियंत्रण नसून, स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्षच केले जाते; तसेच या हॉटेलपैकी बहुतांशी हॉटेलचे बांधकाम बेकायदा किंवा मिळालेल्या परवानगीपेक्षा अतिरिक्त केले असल्याचे असल्याचे वृत्त प्रसिद्ध करून 'महाराष्ट्र टाइम्स'ने या विषयाला वाचा फोडली होती. त्याची दखल घेऊन 'पीएमआरडीए'ने कारवाई केली. त्यामुळे आता येथील गैरप्रकारांना काही प्रमाणात चाप बसेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

'पीएमआरडीए'च्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने मंगळवारी भुकूम येथे कारवाई मोहीम हाती घेतली. 'पीएमआरडीए'ने दिलेल्या माहितीनुसार, मानस चौपाटी, थलासा, श्री स्टेज आणि हॉटेल ९० डिग्री या रेस्टॉरंटचे अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले. या वेळी 'पीएमआरडीए'च्या उपस्थित अधिकाऱ्यांमार्फत बांधकामधारकांना परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करू नये, असे आवाहन करण्यात आले.

### खर्च वसूल करणार

अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी 'पीएमआरडीए'ने पोकलेनचा वापर केला होता; तसेच मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळही नेमले होते. या पाडकामासाठी आलेला खर्च बांधकामधारकांकडून वसूल केला जाईल, असे 'पीएमआरडीए'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### बड्या रेस्टॉरंटकडे काणाडोळा

'पीएमआरडीए'च्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने कारवाई करताना त्याच भागातील अन्य दोन बड्या रेस्टॉरंटकडे काणाडोळा केल्याचे दिसून आले. पाडलेल्या चार रेस्टॉरंटप्रमाणेच संबंधित दोन्ही रेस्टॉरंट कार्यान्वित आहेत. मात्र, 'पीएमआरडीए'ची सावलीही त्यावर न पडल्याने ते दोन्ही रेस्टॉरंट 'पीएमआरडीए'च्या लेखी अधिकृत आहेत का, अशी चर्चा स्थानिकांमध्ये कारवाईच्या वेळेस रंगली होती.

---

# हृदयद्रावक! खेळताना अनर्थ घडला, दीड वर्षीय चिमुरड्याचा मृत्यू; आई-वडिलांचा आक्रोश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीत पाण्याच्या टाकीत पडून एका २० महिन्याच्या मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. हर्ष सागर जगताप (वय २० महिने, रा.आश्रम रोड, उरुळी कांचन, ता.हवेली) असं टाकीत पडून बुडून मृत्यू झालेल्या बाळाचे नाव आहे.

मंगळवारी (ता. २३) संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीतील आश्रम रोड परिसरात एका सदनिकेचे काम सुरु आहे. त्या सदनिकेला पाणी मारण्यासाठी त्या ठिकाणी एक पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. तसेच त्या ठिकाणी एक सुरक्षारक्षकाची नेमणूक देखील करण्यात आली आहे. सदनिकेचे काम सुरु असून त्या ठिकाणी लहान मुले दररोज खेळत असतात. मंगळवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास हर्ष हा खेळता खेळता पाण्यात पाण्याच्या टाकीत पडला होता. सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास हर्ष कुठे दिसून न आल्याने त्याची शोधाशोध सुरु केली. यावेळी तो सापडला नाही. त्याला पाहून आई-वडिलांनी हंबरडा फोडला.

# गौतमी पाटीलचा कार्यक्रम आयोजित केला, पोलिसांनी बड्डे बॉयसह मित्राला दणका दिला

## युवा कार्यकर्ते अमित लांडे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

।पिंपरी चिंचवड। महाईन्यूज

**पिंपरी चिंचवडमधील कासारवाडी परिसरातील युवा कार्यकर्ते अमित लांडे यांच्या वाढदिवसाला गौतमी पाटीलच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या प्रकरणी पोलिसांनी आयोजकांवर गुन्हे दाखल झाले आहेत.**



पिंपरी चिंचवड परिसरातील कासारवाडी येथे युवा कार्यकर्ते अमित शंकर लांडे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, हा कार्यक्रम आयोजित करणे आयोजकाला महागात पडले आहे. भोसरी पोलिसात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमित शंकर लांडे आणि आयोजक मयूर रानवडे यांनी कोणतीही परवानगी नसताना गौतमी पाटीलच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यामुळे भोसरी पोलिसांनी ॲक्शन घेत बर्थ डे बॉयवर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलीस कर्मचारी दत्तात्रय कांबळे यांनी भोसरी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. त्यावरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, अमित लांडे यांनी भोसरी पोलिसांकडे गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमाची परवानगी मागितली होती. मात्र, पोलिसांनी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल म्हणून लांडे यांना परवानगी नाकारली होती. नियमाचे पालन न करता अमित लांडे यांनी गौतमी पाटीलच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यामुळे पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# अंकुशराव लांडगे नाट्यगृह ‘घामाघूम’!

## महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष : प्रेक्षक, आयोजकांची नाराजी

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रणा गेल्या एक महिन्यापासून बंद आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात येथे कार्यक्रम घेणाऱ्या आयोजकांना आणि प्रेक्षकांना अक्षरक्षः घाम फुटतोय. त्यामुळे कार्यक्रमांची संख्याही घटली आहे. ही समस्या तातडीने सोडविण्याची मागणी प्रेक्षक आणि आयोजकांमधून होत आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने मात्र, दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे.**



> “कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रणा जुनी झाली असल्याकारणाने ती बदलण्यात येणार आहे. यासाठी चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे.
> -महेश कावळे, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग, इ क्षेत्रीय कार्यालय.

सध्या उन्हाचा तडाखा वाढला आहे. अशा रणरणत्या उन्हाळ्यात कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रणा बंद असल्याने श्रोत्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रणा सुरु करण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाला कळविल्याची माहिती नाट्यगृह व्यवस्थापनाने दिली. मात्र, या वातानुकुलित यंत्रणेतील बिघाड वीज विभागाला सापडला नसल्याचे व्यवस्थापनाचे म्हणणे आहे. त्यामुळे विद्युत विभागाने येथील वातानुलीत यंत्रणा नव्याने बसविण्याचा निर्णय घेतला असल्याची माहितीही देण्यात आली. मात्र, या कामाला वेळ अधिक लागणार आहे.

नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रणा बंद असल्यामुळे कार्यक्रमादरम्यान प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले. नाट्यगृहाने एअर कुलर नाट्यगृहात लावले होते. मात्र, नाट्यगृहाच्या आकाराने ही यंत्रणा तोकडी ठरत होती. त्याचप्रमाणे एअर कुलरचा होणारा आवाजही कार्यक्रमात व्यत्यय आणत होता. त्यामुळे या नाट्यगृहातील वातानुलित यंत्रणा महापालिकेने तातडीने सुरू करणे गरजेचे आहे, अशी भूमिका प्रेक्षकांची आहे.

# भोसरीला अनधिकृत फ्लेक्सचा विळखा, परिसराचे विद्रुपीकरण

## वाहनचालकांचा जीव धोक्यात

।भोसरी । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भोसरी, दिघी, इंद्रायणीनगर परिसरात विविध ठिकाणी लावण्यात येत असलेल्या अनधिकृत फ्लेक्समुळे परिसराचे विद्रूपीकरण होत आहे. हे फ्लेक्स असुरक्षितपणे लावले जात असल्याने, ते पडून पादचारी, वाहनचालकांना अपघात होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. त्यामुळे परिसरात अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.**



> “बऱ्याच वेळेस लावण्यात येणाऱ्या अनधिकृत फ्लेक्समुळे दुकानेही झाकली जातात. त्याचप्रमाणे दुकानात येण्यासाठी फ्लेक्सला वळसा मारून ग्राहकांना दुकानात यावे लागते. त्यामळे या फ्लेक्समळे व्यवसायावरही परिणाम होत आहे. परिसरातील अनधिकृत फ्लेक्सवर वारंवार कारवाई करण्यात येत आहे. मात्र, किवळ्यात अनधिकृत होर्डिंग पडून झालेल्या दुर्घटनेनंतर भोसरी, इंद्रायणीनगर, दिघी परिसरातील अनधिकृत फ्लेक्सची संख्या कमी झाली आहे.
> -राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी, इ प्रभाग

भोसरीतील पीएमटी चौक, भोसरी-आळंदी रस्ता चौक, संविधान चौक, चांदणी चौक, पीसीएमसी चौक, बापूजीबुवा चौक, कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह चौक, लांडेवाडी चौक, दिघी रस्त्यावरील प्रियदर्शनी हायस्कूल, सिद्धेश्वर हायस्कूल चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान चौक, आळंदी रस्त्यावरील मंगलमूर्ती, शास्त्री चौक, चक्रपाणी वसाहत रस्ता, पुणे-नाशिक महामार्गाचा दोन्ही बाजूंकडील सेवा रस्ता, इंद्रायणीनगरातील मिनी मार्केट चौक, साई चौक, श्री तिरुपती बालाजी चौक, इंद्रायणी स्वीट चौक, दिघीतील संत निरंकारी भवन रस्ता, छत्रपती संभाजी महाराज चौक, विठ्ठल मंदिर चौक, पुणे आळंदी रस्ता, मॅगझीन चौक आदी ठिकाणांसह इतर ठिकाणीही फ्लेक्स लावले जातात.

सण, नेत्यांचे वाढदिवस, लग्न समारंभ, व्यावसायिक जाहिरातींसाठी मोठ्या प्रमाणात फ्लेक्स लावले जातात. मात्र, हे फ्लेक्स लावताना सुरक्षिततेची खबरदारी घेतली जात नाही. यापूर्वी बऱ्याच ठिकाणी फ्लेक्सचा लोखंडी सांगडा अंगावर पडून काही नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पूर्वी पीसीएमसी चौकात अनधिकृत लावलेला फ्लेक्स विद्युत रोहित्रांवर पडून विद्युतपुरवठा खंडित होण्याबरोबरच विद्युत पुरवठा एका पानटपरीत उतरल्याचा प्रकार घडला होता. त्याचप्रमाणे पीएमटी चौकातील व्यासपीठावर लावण्यात आलेला फ्लेक्स डोक्यावर पडून, ज्येष्ठ महिला जखमी झाली होती. अशाच घटना इतर ठिकाणीही घडल्याचे नागरिक सांगतात.

भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखालील जागेत वाहनांच्या पार्किंगबरोबरच हातगाडीवाले, पथारीवाले यांचे पुनर्वसन केले आहे. सुरक्षिततेसाठी उड्डाणपुलाखाली लोखंडी जाळी लावण्यात आली आहे. या लोखंडी जाळीचा आधार घेत त्याला अनधिकृत फ्लेक्स लावले जात आहेत. त्याचप्रमाणे या उड्डाणपुलाखालील स्तंभावर विविध नक्षी काम काढत सुशोभीकरण करण्यात आले आहे. या स्तंभासमोरही फ्लेक्स लावले जातात.

# उपमुख्यमंत्री कार्यालयातून फोन आणि चार दिवसांत नोकरी... एका महिलेने ‘असा’ केला संघर्ष

।पिंपरी। महाईन्यूज ।प्रतिनिधी।



पिंपरी-चिंचवड महापालिका सेवेत असलेल्या पतीच्या निधनानंतर अनुकंपा तत्वावर नोकरीत घ्यावे, यासाठी दीड वर्षांपासून हेलपाटे मारणाऱ्या महिलेला उपमुख्यमंत्री कार्यालयातून फोन येताच अवघ्या चार दिवसांत महापालिकेत नोकरी मिळाली. महिलेने उपमुख्यमंत्री कार्यालयातील प्रधान सचिव आणि महापालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ. श्रीकर परदेशी यांच्याशी संपर्क साधून कैफियत मांडली. परदेशी यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्याशी संपर्क साधला अन् अवघ्या चार दिवसांत महिलेला पालिकेतील नोकरीचा आदेश मिळाला.

पूजा कृष्णाजी भोसले असे नोकरी मिळालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांचे पती कृष्णाजी भोसले हे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागात वाहनचालक या पदावर कार्यरत होते. त्यांचे २६ नोव्हेंबर २०२१ रोजी निधन झाले. त्यांच्या जागेवर अनुकंपा तत्त्वानुसार नियुक्ती मिळावी म्हणून त्यांची पत्नी पूजा भोसले यांनी १७ जानेवारी २०२२ रोजी प्रशासनाकडे अर्ज केला; पण पालिका सेवेतच असणाऱ्या त्यांच्या एका नातेवाईकाने वारस नोंदीवरून खोडा घातला. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. पतीच्या मृत्यूनंतर पूजा भोसले यांना पाच आणि आठ वर्षांच्या दोन मुलींचा सांभाळ करणे जिकिरीचे जात होते. कृष्णाजी भोसले हे पालिका सेवेत असताना तत्कालीन आयुक्त डॉ. श्रीकर परदेशी यांच्या गाडीवर चालक म्हणून कार्यरत होते. सध्या डॉ. परदेशी हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रधान सचिव म्हणून कार्यरत आहेत. दीड वर्षांपासून झगडूनही नोकरी मिळत नसल्याने अखेर पूजा भोसले यांनी डॉ. परदेशी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत कैफियत मांडली. डॉ. परदेशी यांनी १५ मे २०२३ रोजी पालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या कानावर हा विषय घातला. त्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले. आयुक्त सिंह यांनी सामान्य प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांना पूजा भोसले यांच्या नियुक्तीची प्रक्रिया करण्याच्या सूचना दिल्या. पूजा यांचा पोलीस पडताळणी अहवाल, वैद्यकीय तपासणी करून तात्काळ अहवाल देण्यात आला. चौथ्या दिवशी म्हणजे १९ मे रोजी पूजा यांना महापालिकेत शिपाई या पदावर नियुक्ती देण्याचा आदेश आयुक्त सिंह यांनी काढला.

# सामाजिक की समाजद्रोही?




युरोपीय समुदायाने तयार केलेल्या कठोर नियमावलीचा आधार घेऊन, आयर्लंडमधील प्रशासकीय यंत्रणांनी 'फेसबुक'ची मालकी असणाऱ्या 'मेटा' या कंपनीला १.२ अब्ज युरोचा दंड ठोठावला आहे. समाजमाध्यमे चालविणाऱ्या कंपन्यांवर जगभरात गेल्या काही काळात जी कारवाई होत आहे; त्यातली ही सगळ्यांत मोठी दंडात्मक कारवाई म्हणावी लागेल. या दंडाच्या कारवाईला आम्ही आव्हान देऊ, असे आता 'मेटा' कंपनीने म्हटले आहे. या सुनावणीमधून जे काही निघेल ते निघेल. मात्र, जगभरातील अब्जावधी नागरिकांची खासगी किंवा सार्वजनिक माहिती जमा करून, तिचा व्यापारी उपयोग करण्याचा या कंपन्यांचा धंदा यापुढे निर्धोकपणे चालणार नाही, एवढा दिलासा तरी या कारवाईने मिळाला आहे. १.२ अब्ज युरो म्हणजे दहा हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम होते. ही रक्कम म्हणजे या कंपनीसाठी 'किस पेड की पत्ती' आहे, अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. या कंपनीचा प्रचंड व्याप व विस्तार पाहता हे खरेही असेल. मात्र, युरोपीय समुदायाप्रमाणे जगातील इतर देशांनीही या कंपन्यांच्या ताळतंत्र सोडून चालणाऱ्या उपद्व्यापांकडे लक्ष दिले, तर त्यांना जागोजागी दंड भरावा लागेल आणि या कंपन्यांची प्रतिमा याने डागाळत जाईल. तेव्हा युरोपीय समुदायाने ठोठावलेला दंड हा रकमेपेक्षा इशारा म्हणून फेसबुक किंवा इतरही कंपन्या कसा घेतात, हे आता पाहावे लागेल. ही कारवाई झाल्यानंतर माहिती आणि तंत्रज्ञान खात्याचे केंद्रीय राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी लवकरच येणारा भारतीय कायदाही असाच कडक असेल, असे म्हटले आहे. हा एका अर्थाने या कंपन्यांना इशारा आहे. तुम्ही




भारतात सध्या ज्या प्रकारे वागता आहात, तसे पुढे तुम्हाला वागता येणार नाही, याचे हे सूचन आहे.

खरे तर भारतात हा कायदा लागू होण्यास बराच विलंब झाला आहे. नव्या कायद्याचे प्रारूप बनविताना या विषयात आघाडी घेतलेल्या ऑस्ट्रेलिया किंवा इतरही देशांमधील कायद्यांचा अभ्यास केंद्र सरकारने केला असेल. आता या कायद्याचा तर्जुमा जूनच्या पहिल्या आठवड्यात सर्वांसाठी खुला होत आहे. त्यावर सूचना मागवून मग तो संसदेत जाईल आणि मग मतदान होऊन नवा 'डिजिटल इंडिया कायदा' अमलात येईल, अशी अपेक्षा आहे. मात्र, केंद्र सरकारने या विषयात तातडी करण्याची गरज आहे. संसदेच्या येत्या पावसाळी अधिवेशनातच हा कायदा मंजूर होऊन अमलात यायला हवा. याचे कारण, हा कायदा नसण्याचे बरेच तोटे आणि तडाखे भारताला सध्या सोसावे लागत आहेत. युरोपीय समुदायातील कायद्याने 'मेटा' कंपनीवर कारवाई होण्याचे मुख्य कारण युरोपमधील ग्राहकांची माहिती अमेरिकेत पाठविण्यात आली. ही माहिती पाठविण्याचा हेतू काय होता किंवा त्यामुळे युरोपीय नागरिकांचे काही नुकसान झाले का, हे प्रश्न पुढचेच आहेत. त्यांच्या खासगी आयुष्यावरचे आणि माहितीवरचे हे आक्रमण आहे. असे आक्रमण करण्याचा कोणताही अधिकार कोणत्याही कंपनीला नाही. 'मेटा' हे नाव अपरिचित असले, तरी या कंपनीत 'फेसबुक', 'मेसेंजर', 'व्हॉट्सअॅप', 'इन्स्टाग्राम', 'ऑक्युलस' ही सगळी आधुनिक संपर्कसाधने येतात. चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीत 'मेटा' कंपनीच्या सर्व संपर्कसाधनांच्या जगातील ग्राहक किंवा वापरकर्त्यांची संख्या तीन अब्ज ८१ कोटी झाली असावी, असा अंदाज आहे. ही किती मोठी प्रचंड ताकद आहे, याचा अदमास या केवळ आकड्यांवरून येणार नाही. जवळपास इतकी आयुष्ये आणि त्यांचे सर्व प्रकारचे व्यक्तिगत, व्यावसायिक, सामाजिक निर्णय, वर्तन या कंपनीच्या इशाऱ्यावर चालू शकेल, असेही म्हणता येईल. हा धोका भयंकर आहे.

भारतातील समाजमाध्यमांचे उपयोग आणि त्यांचा धोका ही दुधारी तलवार आहे. गेले काही दिवस मणिपूरमधील इंटरनेट सेवा बंद आहे. आताही ही मुदत पुन्हा २६ तारखेपर्यंत वाढविण्यात आली आहे. मणिपूर अशांत आहे आणि समाजमाध्यमे या अशांततेत व हिंसाचारात भर टाकतात, या संशयामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. हा अपवाद नाही. भारतीय समाज हा मुळातच कमालीच्या अस्थिर, अनिश्चल मनोवृत्तीचा आहे. तो बव्हंश निर्णय भावनांच्या आधारांवर घेत असतो. समाजमाध्यमांच्या प्रभावाने किंवा कुकर्मांनी भारतात भावना किंवा हिंसा भडकावणे किती सोपे आहे, हे वारंवार दिसून आले आहे. तेव्हा युरोप किंवा अमेरिका यांच्यापेक्षा भारतापुढचे समाजमाध्यमांचे आव्हान अधिक गुंतागुंतीचे आणि व्यामिश्र आहे. 'मेटा' कंपनीला जबर दंड ठोठावून युरोपीय समुदायाने एक मार्ग दाखविला आहे. समाजमाध्यमांच्या अतिरेकी स्वातंत्र्याचा बडिवार न माजवता, केंद्र सरकारला तर प्रसंगी याहूनही कडक कारवाई करावी लागू शकते. त्यासाठी आधी आपला कायदा सुसज्ज व्हायला हवा. समाजमाध्यमे आपल्या नितांत उपयोगाची आहेत.

## संपादकीय »

### तर भारत विश्वगुरू ठरला असता

***'संसद भवन उद्‌घाटन. त्यावरून हे जवळजवळ स्पष्ट झाले की, हे उद्‌घाटन पंतप्रधानांच्याच हस्ते होणार. राष्ट्रपती की पंतप्रधान या वादावर याच रीतीने पडदा पडणार आणि पंतप्रधानांचेच नाव संसद भवनाच्या भिंतीवर कायमचे कोरले जाणार.***

या वादामध्ये अगदी विरोधकांकडूनदेखील या भवनाचे उदघाटन करण्याचे जणू हेच पर्याय आहेत, असे मानले गेले आहे. वास्तविक ज्यांच्या हस्ते हे उद्‌घाटन व्हायला हवे ते लोक पडद्यामागेच राहणार. ज्यांनी हे भवन बांधले, त्याचा पाया घातला, विटा रचल्या, रंग दिला, भवन सजवले त्या कष्टकऱ्यांच्या सामूहिक हातांनी उद्‌घाटन झाले असते तर हा देश खरोखरच विश्वगुरू झाला असता. ज्यांचे हात माती, सिमेंट, खाडी, राडारोडा यांनी मळलेले आहेत ते हात कोणत्याही नेत्याच्या हातांपेक्षा शुभ आहेत आणि त्यांचीच सत्ता या देशात आहे असेही जगाला दिसले असते. त्या सर्व धर्मीय कष्टकऱ्यांची नावे नव्या संसद भवनाच्या भिंतींवर दिमाखाने झळकली असती. त्यांची नावे अमर झाली असती.

**सालाबादाप्रमाणे प्रशासकीय सेवांचे निकाल जाहीर झाले. 'ब्रेकिंग' बातम्यांचा उच्छाद तसेच 'दिव्याखाली बसून कट्टर अभ्यास' वगैरे हृद्य मनोगते ऐकून अंमळ गदगदून आले. एकंदरीत हा वार्षिक निकाल महोत्सव पराकोटीचा हास्यास्पद वाटतो.**

## लोकसेवा परीक्षा कायमस्वरूपी बंद करा

इतके उच्चविद्याविभूषित, प्रेरणादायी इत्यादी महान अधिकारी होऊनही भारतीय गाव-शहरे हिंडल्यास केवळ सार्वत्रिक बकालीकरण दिसते. सर्वच्या सर्व सार्वजनिक व्यवस्थांचा पूर्ण बोजवारा उडालेला असताना सामान्य नागरिक मात्र जीव मुठीत धरून आयुष्य कंठत असतात. भ्रष्टाचार तर तसूभरही कमी झालेला नाही, उलट प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मालमत्ताच पगारापेक्षा कैकपट आहेत. असे का, याचे उत्तर कोणी उमेदवार देईल काय?

थोडक्यात कष्ट संघर्ष वगैरे याचे कौतुक आहेच. परंतु, दरवर्षी इतके 'लोकसेवेस' कटिबद्ध प्रशासकीय 'कार्यकर्ते' जगभरातील उतमोत्तम क्षेत्रे, नोकऱ्या सोडून तसेच अनेक मौल्यवान वर्षे फुकट घालवून, एकदा पद मिळाल्यावरही पुन्हा परीक्षा 'ट्राय' करून देशाचा नक्की कोणता विकास साधतात याचा सामाजिक ताळेबंद मांडणे गरजेचे आहे. काही सुमार प्रशासकीय पदांभोवती अमाप सत्तेचे केंद्रीकरण झाल्याने ही 'उंदीर स्पर्धा' कसोशीने लढली जाते. त्यास जात धर्म वगैरे दृष्टिकोन तर आहेतच. जसे अति क्रिकेटमुळे इतर खेळांचे नुकसान होते




तसे चमकोगिरी करणाऱ्या सामान्य क्षेत्राला अतिमहत्त्व दिल्याने इतर अनेक मौल्यवान क्षेत्रांचे प्रचंड नुकसान होते. बाकी क्लासेस, रामप्रहरी मोटिव्हेशन वगैरे उखळ पांढरे करणारे कुटिरोद्योग चवीला आहेतच.

यापेक्षा अशा भ्रष्ट तसेच चमकोगिरी लोकसेवा परीक्षा कायमस्वरूपी बंद करून सरकारने खासगी क्षेत्रांसारखी सरळ भरती करावी, हेच सामान्य नागरिकांच्या हिताचे. ज्या देशातील तरुणांचे ध्येय 'काहीतरी मोठे' म्हणजे ब्रिटिश वळणाच्या व्यवस्थेत कारकुनी पद भूषवणे हे आहे तिथे फार काही विकास घडेल याची शाश्वती आम्हा सामान्यजनांस नाही! सदरहू निवेदन कोणाला झोंबल्यास उत्साही उमेदवारांनी कोणत्याही सरकारी ऑफिसात पाय मोकळे करायला अंमळ फेरफटका मारल्यास उदात्त 'लोकसेवेचे' दर्शन घडेलच..!

## ॥ अभंगवाणी ॥



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।  
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥  
नव्हे आराणुक लौकिकापासून ।  
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अहंकारी माणूस देश चालवू शकत नाही!

## अरविंद केजरीवाल यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका

।मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिल्लीतील सनदी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे अधिकार राज्य सरकारला असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने देवूनही केंद्र सरकारने त्या विरोधात अहंकारातून अध्यादेश जारी केला आहे. अहंकारी आणि स्वार्थी नेता देश चालवू शकत नाही, असा जोरदार हल्ला दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर चढविला.**



दिल्ली सरकारवर नियंत्रण आणण्याच्या अध्यादेशाविरोधात विरोधकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी केजरीवाल मुंबईत आले असून त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची ‘ मातोश्री ’ निवासस्थानी भेट घेतली. या संदर्भातील विधेयकाला संसदेत विरोध करण्यासाठी केजरीवाल यांच्या लढाईला ठाकरे यांनी साथ देण्याचे जाहीर केले आहे.

राज्य सरकारकडे असलेल्या प्रशासकीय विषय किंवा बाबींसाठी आवश्यक सनदी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या व बदल्या करण्याचा अधिकार राज्य सरकारला असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने ११ मे रोजी दिला होता. त्यानंतर आठच दिवसांत याविरोधात अध्यादेश जारी करून केंद्र सरकारने सनदी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या व बदल्यांचे अधिकार आपल्याकडेच ठेवले आहेत. हे अधिकार मिळविण्यासाठी दिल्ली राज्य सरकारने आठ वर्षे न्यायालयीन लढाई करूनही केंद्र सरकार अहंकारातून न्यायालयीन निर्णयाविरोधात भूमिका घेत आहे. हे लोकशाही तत्त्वांविरोधातही असल्याची टीका केजरीवाल यांनी केली.या अध्यादेशासंदर्भातील विधेयक संसदेत मांडले जाईल, तेव्हा भाजपचे राज्यसभेत बहुमत नसल्याने तेथे ते अडविले जावे, यासाठी केजरीवाल यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यादृष्टीने देशभरातील विरोधी पक्षांचा पाठिंबा मिळविण्याचे केजरीवाल यांचे प्रयत्न असून त्यांनी ठाकरे यांची भेट घेऊन विरोधकांच्या भाजपविरोधातील ऐक्याबाबतही चर्चा केली. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हेही त्यांच्याबरोबर होते. त्यानंतर केजरीवाल, मान आणि ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. केजरीवाल हे गुरुवारी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेणार आहेत.

### राजकारणापलीकडे नाती जपतो – ठाकरे

**» जनतेला जागे करण्यासाठी आम्ही एकत्र आलो असून नाती जपण्यासाठी शिवसेना आणि ‘मातोश्री’ प्रसिद्ध आहे. आम्ही राजकारणापलीकडे जाऊन नाती जपतो, असे ठाकरे यांनी यावेळी सांगितले. लोकशाही मूल्यांच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आवश्यक होता.**

# ‘मुंबई ते नवी मुंबई प्रवास २० मिनिटांत’

।मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबई पारबंदर प्रकल्पाअंतर्गत (शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतू) मुंबई आणि नवी मुंबई शहराची जोडणी आता पूर्ण झाली असून पुढील काम पूर्ण करत डिसेंबरमध्ये हा सागरी सेतू वाहतुकीस खुला होईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तर हा सागरी सेतू वाहतुकीस खुला झाल्यास मुंबई ते नवी मुंबई अंतर दीड-दोन तासाऐवजी केवळ २० मिनिटांत पूर्ण होईल असेही त्यांनी सांगितले. आजचा दिवस आपल्यासाठी आनंदाचा दिवस आहे. हा सागरी सेतू म्हणजे केवळ सागरी सेतू नाही तर राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारा मार्ग असल्याची भावना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. मुंबई आणि नवी मुंबई शहरांना थेट जोडत या दोन्ही शहरांतील प्रवासाचे अंतर दीड ते दोन तासांऐवजी केवळ २० ते २२ मिनिटांत पार करता यावे यासाठी मुंबई पारबंदर प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. २०१९ पासून या प्रकल्पाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) सुरू आहे. मागील दोन वर्षांत या प्रकल्पाच्या कामाचा वेग वाढविण्यात आला आहे. सद्य:स्थितीत या प्रकल्पाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामाला वेग देत नोव्हेंबर २०२३ मध्ये हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. या प्रकल्पातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असलेल्या मुंबई शहर (शिवडी) आणि नवी मुंबई (शिवाजीनगर) दोन्हींना जोडणाऱ्या २२ किमीच्या संपूर्ण सागरी सेतूचे काम पूर्ण झाले आहे. या कामाचा आढावा बुधवारी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी घेतला. अंत्यत कठीण आणि आव्हानात्मक काम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएचे कौतुक केले. या प्रकल्पामुळे मुंबईवरून नवी मुंबईच नव्हे तर पुढे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर जाणेही सोपे होणार आहे, कारण हा सेतू द्रुतगती मार्गाशी जोडला जाणार आहे. तसेच नवी मुंबई विमानतळ, जेएनपीएलाही वेगाने जाता येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भविष्यात अलिबाग-विरार बहुउद्देशीय मार्गिकेशीही सागरी सेतू जोडला जाणार असल्याने हा प्रकल्प सामाजिक-आर्थिक विकास साधणारा प्रकल्प ठरणार असल्याचे यावेळी मुख्यमंत्री म्हणाले.

# नव्या संसद भवनाच्या उद्घाटनास राष्ट्रपतींना निमंत्रण नसल्याचा निषेध

## » 20 विरोधी पक्षांचा बहिष्कार: समारंभाला राष्ट्रपतींना निमंत्रण नाही

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रपतींना निमंत्रण न देता केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत नव्या संसद भवनाचे उद्घाटन होत असल्याचा निषेध करत या सोहळ्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय १९ भाजपेतर विरोधी पक्षांनी बुधवारी घेतला. यामुळे या सोहळ्यावरून वाद तीव्र झाला आहे. नवे संसद भवन ही भारतीय संस्कृती आणि परंपरांशी आधुनिकतेची नाळ जोडणारी इमारत असून, समृद्ध लोकशाहीचे प्रतिक असल्याचे केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत विशद केले असले तरी, नव्या इमारतीच्या उद्घाटन समारंभाला राष्ट्रपतींना निमंत्रण देण्यात आलेले नसल्याने विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली. केंद्र सरकारची भूमिका प्रजासत्ताक भारताच्या प्रमुखांचा आणि संविधानाचा अपमान आहे, अशी टीका करीत विरोधी पक्षांनी बुधवारी संयुक्त निवेदनाद्वारे केली.**

षटकोनी आकाराच्या नव्या संसद भवनाचे उद्घाटन पंतप्रधान मोदींच्या हस्ते रविवारी, २८ मे रोजी दुपारी १२ वाजता होणार आहे. या समारंभाची निमंत्रण पत्रिका लोकसभा सचिवालयाने संसदेच्या सर्व सदस्यांना पाठवली असून, पत्रिकेवर पंतप्रधान मोदी व लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला या फक्त दोघांची नावे समाविष्ट आहेत. निमंत्रण पत्रिकेवरूनही विरोधी पक्षांनी हल्लाबोल केला असून राज्यसभेचे सभापती म्हणून उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचेही नाव वगळण्यात आल्याची टीका केली आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आनंद शर्मा यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत उद्घाटन सोहळ्यावर विरोधकांच्या बहिष्काराची शक्यता व्यक्त केली होती. त्यानंतर, आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस, शिवसेना- उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल या पक्षांनीही मंगळवारी बहिष्काराची घोषणा केली. या पक्षांसह द्रमुक, समाजवादी पक्ष, भाकप, माकप, झारखंड मुक्ती मोर्चा, केरळ काँग्रेस (मणि), विदुथलाई चिरुथिगल कच्ची (व्हीसीके), राष्ट्रीय लोकदल, जनता दल (सं), इंडियन युनियन मुस्लिम लीग, नॅशनल कॉन्फरन्स, रिव्हॉल्युशनरी सोशलिस्ट पक्ष, एमडीएमके या १९ विरोधी पक्षांनी बुधवारी संयुक्त निवेदन प्रसिद्ध करून बहिष्काराची भूमिका स्पष्ट केली. त्यात तेलंगणातील सत्ताधारी पक्ष भारत राष्ट्र समिती, वायएसआर काँग्रेस, बिजू जनता दल यांचा समावेश नसून, या पक्षांनी स्पष्ट केलेली नाही. या विरोधी पक्षांच्या निवेदनामध्ये अकाली शिरोमणी दलाचा समावेश नसून, पक्षाने सोहळ्यात उपस्थित राहणार असल्याचे म्हटले आहे.



### ‘राष्ट्रपतींचा अवमान’

**» केंद्र सरकारने लोकशाही धोक्यात आणली असून ज्या निरंकुश पद्धतीने नव्या संसद भवनाची निर्मिती झाली, त्यावर विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला होता. तरीही मतभेद बाजूला ठेवून या उद्घाटन समारंभामध्ये सहभागी होण्याची विरोधकांची इच्छा होती. पण, राष्ट्रपतींना वगळून मोदींनी देशाच्या प्रमुखाचा अवमान केला आहे. भाजपने निवडणुकीसाठी आदिवासी समाजातून आलेल्या मुर्मूचा वापर केला गेला, अशी खरमरीत टीका विरोधकांनी केली आहे.**

# सोनाली कुलकर्णीने शेअर केला राखी सावंतबरोबर घडलेला १५ वर्षांपूर्वीचा किस्सा

छोट्या पडद्यावरील अतिशय वादग्रस्त पण तितक्याच आवडीने पाहिला जाणारा शो म्हणजे 'बिग बॉस'. सध्या 'बिग बॉस मराठी'चं चौथं पर्व चर्चेत आहे. अभिनेता पुष्कर जोग व मराठमोळी अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने 'बिग बॉस'मध्ये पाहुणे कलाकार म्हणून हजेरी लावली आहे.

सोनाली व पुष्करने एन्ट्री केल्यानंतर 'बिग बॉस'च्या घरातील सदस्यांची भेट घेतली. यावेळी सोनालीने एक जुना किस्सा शेअर केला. काही दिवसांपूर्वी वाइल्ड कार्डद्वारे 'बिग बॉस'च्या घरात प्रवेश केलेली राखी सावंत मनोरंजनाचं परिपूर्ण पॅकेज आहे. राखी काही ना काही करुन प्रेक्षकांसह घरातील सदस्यांचं मनोरंजन करताना दिसते. याच राखी सावंतची आई चाहती असल्याचं सोनाली कुलकर्णीने सांगितलं.सोनाली म्हणाली, "माझी आई राखी सावंतची खूप मोठी चाहती आहे. १५ वर्षांपूर्वी घडलेली ही गोष्ट आहे. मी व आई एकदा मॉलमध्ये गेलो होतो. तिथे तिने राखीला पाहिलं आणि आई राखीचं नाव घेत जोरात ओरडली. माझ्या आईने तेव्हा राखीबरोबर फोटोही काढला होता. तो फोटो आजही माझ्याकडे आहे". राखी सहभागी झालेली 'बिग बॉस'चे पर्वही सोनालीने पाहिले असल्याचं तिने सांगितलं. शिवाय राखीला सोशल मीडियावर फॉलो करत असल्याचंही ती म्हणाली.

"राखी सावंतकडे काय आहे ते मला माहीत नाही. पण सगळ्यांचं मनोरंजन करण्याचा ती पूरेपूर प्रयत्न करते. आणि यात ती यशस्वीही होते", असंही पुढे सोनाली राखीचं कौतुक करत म्हणाली. 'बिग बॉस'च्या घरातून बाहेर पडल्यानंतर सोनालीच्या आईला नक्की भेटणार असल्याचं राखी म्हणाली.



# नजरा नजर झाली.. ठसन दिली.. पण झालं उलटच.. रितेश जेनेलियाची पहिली भेट

बॉलिवूड अभिनेता रितेश देशमुख हा हिंदीच नाही तर मराठी चित्रपटातील लोकप्रिय अभिनेता आहे. आज रितेश देशमुखची ओळख आज एक लोकप्रिय अभिनेता असलं तरी त्यांची फिल्म इंडस्ट्रीत येण्याआधी त्याची ओळख ही वेगळी होती. त्याचे वडिल विलासराव देशमूख हे महाराष्ट्राचे मुख्यंमत्री असल्याने त्याला सर्वजण मुख्यमंत्र्यांचा मुलगा म्हणूनच ओळखच होते. यामूळे अनेकांचं त्याच्या विषयी अनेक मत होते. त्यातच त्याची पत्नी जेनिलिया हिचंही रितेश बद्दल असंच वेगळं काही तरी मत होत. एक मुख्यमंत्र्यांचा मुलगा तर खूप गर्विष्ठ असणार अस मत जेनिलिया देशमुख होत. रितेश देशमुख आज त्याचा ४४ वा वाढदिवस साजरा करत आहे.

सर्वसामान्य घरातून आलेली जेनेलिया आणि राजकारणी घरातुन आलेला रितेश देशमुख यांची पहिली ओळख हैदराबाद एअरपोर्ट झाली तेव्हा जेनेलियाला वाटले रितेश देशमुख खुप घमंडी आहे. तो एक राजकारणी घरातुन आला आहे तर खुप आगाऊ असेल. पण नंतर जेव्हा ते एकमेंकाना चांगले ओळखू लागले तेव्हा या दोघांमध्ये चांगली मैत्री झाली. त्याच्यासोबत वेळ घालवल्यानंतर तिचं रितेश बदल मत वेगळं झालं.एका शोमध्ये जेनेलियाने सांगितले होते रितेश बरोबर पहिल्यांदा मी मोठ्या अंहकारी आवाजात बोलले पण तेव्हा रितेश खुप सौम्य आवाजात बोलला तेव्हा माझं मत बदललं. रितेश आणि जेनेलियाने त्यांच्यात चालेलं प्रेमाचं नातं त्यांनी कोणालाच बरेच दिवस सांगितलं नव्हते सरळ लग्नाच निमंत्रण देतचं त्यांनी सर्वांना याबद्दल सांगितलं. दरम्यान, रितेश आणि जेनेलिया एकमेकांच्या जवळ आले आणि 10 वर्षे डेट केल्यानंतर दोघांनी 3 फेब्रुवारी 2012 रोजी लग्न केले. रितेश आणि जेनेलियामध्ये ९ वर्षांचा फरक आहे.



# 'एका लग्नाची पुढची गोष्ट'ला फालतू आणि दर्जाहीन म्हणणाऱ्याला प्रशांत दामलेंचं सडेतोड उत्तर,



'एका लग्नाची पुढची गोष्ट'ला फालतू आणि दर्जाहीन म्हणणाऱ्याला प्रशांत दामलेंचं सडेतोड उत्तर, म्हणाले...

अभिनेते प्रशांत दामले हे गेल्या अनेक वर्षांपासून मराठी नाट्यसृष्टीमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी अनेक लोकप्रिय नाटकांमध्ये महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्यांच्या अभिनयाचे लाखो चाहते आहेत. काही दिवसांपूर्वीच त्यांनी त्यांच्या कारकीर्दीमधला १२ हजार ५००वा नाट्यप्रयोग सादर केला. प्रशांत दामले नाट्यसृष्टीत जितके सक्रीय असतात तितकेच सक्रिय ते सोशल मीडियावरदेखील असतात. सोशल मीडियावरून ते नेहमी चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत असतात. पण आता नुकतंच त्यांच्या 'एका लग्नाची पुढची गोष्ट' नाटकाला दर्जाहीन म्हणणाऱ्याला त्यांनी त्यांच्या शैलीत सडेतोड उत्तर दिलं आहे.

सोशल मीडियावर सक्रिय राहून ते नाटकांच्या प्रयोगादरम्यान आलेले अनुभव चाहात्यांची शेअर करत असतात. काही दिवसांपूर्वीच ते त्यांच्या 'एका लग्नाची पुढची गोष्ट' या नाटकाच्या प्रयोगासाठी संभाजीनगर येथे गेले होते. प्रवासादरम्यानचा एक व्हिडीओ पोस्ट करत त्यांनी तेथील रस्त्याची अवस्था कशी आहे हे चाहत्यांची शेअर केलं होतं. त्याची बातमी एका न्यूज पोर्टलने केली आणि त्या बातमीवर नेटकऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या.या बातमीवर कमेंट करत एका नेटकऱ्याने लिहिलं "मुळात हे पुढची गोष्ट नाटकच अतिशय फालतू आणि दर्जाहीन आहे. त्या गोष्टीत काहीही जीव नाही." नेटकऱ्याच्या या कमेंटवर प्रशांत दामले यांनीही त्यांच्या स्टाईलने सडेतोड उत्तर दिलं आहे. त्यांनी लिहिलं, "बरं... त्याच नाटकाचे ५४७ प्रयोग झाले आहेत. प्रत्येकाचा दृष्टिकोन असतो की." त्यांच्या या उत्तराने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. दरम्यान प्रशांत दामले यांची 'एका लग्नाची पुढची गोष्ट' आणि 'सारखं काहीतरी होतंय' ही दोन नाटकं रंगभूमीवर सुरु आहेत. या दोन्ही नाटकांना उत्कृष्ट प्रतिसाद मिळतोय.



# ब्रेक घेण्याचा चॉइस माझा" – काजोल

माझ्या प्रत्यक्ष जीवनात आणि करिअरमध्येही मातृत्वाला अनन्यसाधारण महत्त्व आहे...

अभिनेत्री काजोल

मी जशी घडले त्यामागे माझी आई अभिनेत्री तनुजा, माझी आजी शोभना समर्थ यांची मूल्यं, या दोघींचे पालनपोषण होते. माझी जडणघडण, माझी विचारसरणी यावर आई आणि आजी यांचा प्रभाव असूनही माझे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडले, याचं श्रेयदेखील या दोघींचं. आजी-शोभना समर्थ, आई तनुजा आणि आजीची आई रतनबाई शिलोत्री या सगळ्या कर्तृत्ववान, स्वतंत्र बाण्याच्या, स्वावलंबी, खंबीर स्त्रिया, आजच्या भाषेत सांगायचं झाल्यास 'करिअरस्टिक वूमन'. मी लहान असताना आजी, आईला नेहमीच काम करताना पाहिलंय, आईने रुपेरी पडद्यावर प्रथम काम केलं तेव्हा तिचं वय फक्त ७ होतं. आई गे ल ी ७३ वर्षं सतत काम करतेय! माझ्यावर त्यांचा प्रभाव न पडल्यास नवल होतं. अभिनय हा रक्तात भिनलेला व्यवसाय असल्यानं मी अभिनयाकडे आकृष्ट झाले हे स्वाभाविकच होतं त्यामुळे आईने मला उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठवलं तरी मी अभिनयाच्या ओढीने भारतात परतले. विवाहानंतर, विशेषतः मातृत्वानंतर मी करिअरमधून 'ब्रेक'घेतला. अभिनय करणं ही कधीही आर्थिक निकड नव्हती. अभिनय ही

# आला रे! एमआय पलटणचा डंका!

## मुंबईचा लखनऊवर 81 धावांनी दणदणीत विजय

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३च्या एलिमिनेटर सामन्यात मुंबई इंडियन्सने लखनऊ सुपर जायंट्सचा ८१ धावांनी पराभव केला. यासह मुंबईने दुसऱ्या क्वालिफायरमध्ये स्थान मिळवले आहे. आता शुक्रवारी मुंबईचा सामना गुजरातशी होणार आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने १८२ धावा केल्या आणि प्रत्युत्तरात लखनऊचा संघ केवळ १०१ धावाच करू शकला. या पराभवामुळे लखनऊचा आयपीएल २०२३मधील प्रवास संपला आहे.**



चालू हंगामात बुधवारी झालेल्या एलिमिनेशन सामन्यात मुंबई इंडियन्सने लखनऊ सुपर जायंट्सचा ८१ धावांनी पराभव केला. या विजयासह मुंबई इंडियन्स संघाने क्वालिफायर-२ मध्ये स्थान पक्के केले. आता २६ मे रोजी जगातील सर्वात मोठे स्टेडियम, अहमदाबाद, मुंबई येथील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये गतविजेत्याचा सामना होणार आहे. चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम खेळताना मुंबईने २० षटकांत ८ गडी गमावून १८२ धावा केल्या आणि मुंबईला १८३ धावांचे लक्ष्य दिले. प्रत्युत्तरात लखनऊचा संघ १६.३ षटकात १०१ धावांवर सर्वबाद झाला. लखनऊचा संघ सलग दुसऱ्यांदा प्लेऑफमध्ये पराभूत होऊन बाहेर पडला. त्याचवेळी मुंबईने लखनऊच्या विजयी घोडदौडीला ब्रेक लावला. सलग तीन पराभवानंतर मुंबईचा लखनऊ विरुद्धचा हा पहिला विजय आहे.

तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने आठ गड्यांच्या मोबदल्यात १८२ धावा केल्या. मुंबईकडून कॅमेरून ग्रीनने सर्वाधिक ४१ धावा केल्या. मात्र, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि नेहल वढेरा यांच्या उपयुक्त खेळींनी मुंबईची धावसंख्या १८० धावांच्या पुढे नेली. लखनऊकडून नवीन-उल-हकने चार बळी घेत मुंबईला २०० धावांचा टप्पा पार करण्यापासून रोखले. यश ठाकूरला तीन आणि मोहसीन खानला एक विकेट मिळाली. या सामन्यातील पराभवाने लखनौचे प्लेऑफमध्ये पहिला विजय मिळवण्याचे स्वप्न भंगले. या संघाने गेल्या वर्षी एलिमिनेटर सामनाही खेळला होता आणि त्यात पराभव झाला होता.

### लखनऊने अवघ्या 32 धावांत 7 गडी गमावले

प्रत्युत्तरात लखनौचा संघ १६.३ षटकात १०१ धावांवर सर्वबाद झाला. २५ धावांच्या आतच संघाचे दोन्ही सलामीवीर बाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतले. इम्पॅक्ट खेळाडू काईल मेयर्स १८ धावा आणि प्रेरक मांकड ३ धावा करून बाद झाला. क्रुणाल पांड्यालाही मोठी खेळी खेळता आली नाही. तो अवघ्या ८ धावांवर बाद झाला. यानंतर आयुष बदोनीलाही संघासाठी मोठी खेळी करता आली नाही. तो केवळ १ धाव करून पॅव्हेलियनमध्ये परतला. निकोलस पूरन गोल्डन डक बनला. लखनऊकडून धडाकेबाज खेळी करणारा मार्कस स्टॉयनिस धावबाद झाला. त्याने २७ चेंडूत सर्वाधिक ४० धावा केल्या. यानंतर कृष्णप्पा गौतमही धावबाद झाला. रवी बिश्नोईलाही काही विशेष कामगिरी करता आली नाही. तो अवघ्या 3 धावांवर बाद झाला. यानंतर दीपक हुडाही धावबाद झाला. १३ चेंडूत एका षटकाराच्या मदतीने १५ धावा करून तो बाद झाला. यानंतर लखनऊच्या विकेट्स ठराविक अंतरानंतर विकेट्स पडत राहिल्या. मुंबईच्या आकाश मधवालने शानदार गोलंदाजी करत संघाला विजय मिळवून दिला. आकाशने १.४२ च्या स्ट्राइक रेटने ३.३ षटकात केवळ ५ धावा देत सर्वाधिक ५ बळी घेतले.

---

## सोशल मीडियावर ट्रोल झाला पण मैदान गाजवलं

### नवीन उल हकने रोहितसह सूर्या-ग्रीनचा झंझावात थांबवला

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ चा एलिमिनेटर सामना मुंबई इंडियन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात चेन्नईच्या चिदंबरम स्टेडियममध्ये होत आहे. मुंबईचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मुंबई इंडियन्सने २० षटकात ८ विकेट्स गमावत १८२ धावांपर्यंत मजल मारली. त्यामुळे लखनऊला विजयासाठी १८३ धावांचं लक्ष्य गाठावं लागणार आहे. मुंबईसाठी सलामीला उतरलेल्या ईशान किशन आणि रोहितने मुंबईला चांगली सुरुवात देण्याचा प्रयत्न केला. परंतु, लखनऊचा वेगवान गोलंदाज नवीन उल हकने भेदक मारा करून रोहितला ११ धावांवर असताना झेलबाद केला.**



त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि कॅमरून ग्रीनने धडाकेबाज फलंदाजी करून मुंबईची धावसंख्या शंभरी पार केली. मात्र, नवीनने अप्रतिम गोलंदाजी करून या दोन्ही दिग्गज फलंदाजांना बाद केलं आणि धावांचा झंझावात थांबवला.

नवीनने तिलक वर्मालाही बाद केलं आणि मुंबईला मोठा धक्का दिला. नवीनच्या जबरदस्त गोलंदाजीचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.

मुंबई इंडियन्ससाठी ईशान किशनने (१५), रोहित शर्मा (११), कॅमरून ग्रीन (४१), सूर्यकुमार यादव (३३), तिलक वर्मा (२६),

टीम डेविड (१३), नेहल वढेरा (२३), ख्रिस जॉर्डन (४), तर ऋतिक शौकीन शून्य धावांवर नाबाद राहिला. लखनऊसाठी नवीन उल हकने चार विकेटस् घेतल्या. यश ठाकूरने तीन विकेट्स घेतल्या, तर मोहसिन खानला एका विकेटवर समाधान मानावं लागलं.

## निवृत्तीबाबत इतक्यात निर्णय नाही -धोनी

। चेन्नई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटचा सराव आणि सामन्यांमध्ये खेळल्यामुळे शरीरावर ताण पडत असला, तरी निवृत्तीबाबतचा निर्णय आपण इतक्यातच घेणार नसून विचार करण्यासाठी आठ-नऊ महिन्यांचा कालावधी असल्याचे चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी म्हणाला. धोनीच्या नेतृत्वाखालील चेन्नई संघाने मंगळवारी झालेल्या 'क्वालिफायर-१'च्या सामन्यात गुजरात टायटन्सवर १५ धावांनी मात करत 'आयपीएल'च्या अंतिम फेरीत प्रवेश केला. रविवारी होणारा अंतिम सामना धोनीच्या कारकीर्दीतील अखेरचा सामना असू शकेल असे म्हटले जात आहे. मात्र, तूर्त आपण निवृत्तीचा निर्णय घेतला नसल्याचे धोनीने स्पष्ट केले. "या स्पर्धेत खेळल्याने माझ्या शरीरावर नक्कीच ताण पडतो आहे. मी चार महिने



घरापासून दूर आहे. त्यामुळे भविष्यात मी इतका वेळ घराबाहेर राहणे पसंत करेन का, हे आताच सांगणे अवघड आहे," असे धोनी म्हणाला.

"मी ३१ जानेवारीला घराबाहेर पडलो, माझे दुसरे काम संपवले आणि २ किंवा ३ मार्चपासून सरावाला सुरुवात केली. 'आयपीएल'सारख्या स्पर्धेची तयारी करताना खूप मेहनत घ्यावी लागते. त्यामुळे पुढे काय होईल हे आता सांगू शकत नाही. (निवृत्तीबाबत) निर्णय घेण्यासाठी माझ्याकडे आठ-नऊ महिन्यांचा कालावधी आहे. मी आताच याचा ताण घेणार नाही. पुढील हंगामासाठीची खेळाडू लिलावप्रक्रिया डिसेंबरमध्ये पार पडेल.